॥श्रीरामसमर्थ॥



# राष्ट्रगुरू समर्थ रामदास स्वामी महाराज

# महानिर्वाण

श्रीमन् महागणपतये नमः। श्रीसरस्वतैय नमः। श्रीगुरवे नमः ।




यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत्क्वचित् ।

# समर्थमहानिर्वाण

सुभाष भगवंतराव खर्डेकर

श्रीमन् महागणपतये नमः। श्रीसरस्वतैय नमः। श्रीगुरवे नमः ।

संपूर्ण आरोग्याची हमी फक्त पंधरा मिनिटांमध्ये. दररोज.



॥श्रीरामसमर्थ॥

# समर्थ महानिर्वाण

**लेखक-** सुभाष भगवंतराव खर्डेकर
(अध्यक्ष. श्रीसूर्यस्थान समर्थ विद्यारोग्य केंद्र, नासिक.)

प्रकाशक
**श्रीसूर्यस्थान समर्थ विद्यारोग्य केंद्र, नासिक.**(एफ-११९३४ नासिक)
‘काशिवंत’ पाटील लेन – ४, कॉलेज रोड नासिक – ४२२००५
दूरध्वनी- ०२५३ २५७४२९३ भमणध्वनी- +९१९४०३९१४३७४

श्रीमन् महागणपतये नमः। श्रीसरस्वतैय नमः। श्रीगुरवे नमः ।

संपूर्ण आरोग्याची हमी फक्त पंधरा मिनिटांमध्ये. दररोज.



॥जय जय रघुवीर समर्थ॥

# समर्थ महानिर्वाण

**प्रकाशक-**
**श्रीसूर्यस्थान समर्थ विद्यारोग्य केंद्र, नासिक.**(एफ-११९३४ नासिक) ‘काशिवंत’ पाटील लेन – ४, कॉलेज रोड नासिक – ४२२००५
दूरध्वनी- ०२५३ २५७४२९३ भमणध्वनी- +९१९४०३९१४३७४
**लेखक**सुभाष भगवंतराव खर्डेकर
‘काशिवंत’ पाटील लेन – 4, कॉलेज रोड, नासिक – ४२२००५
दूरध्वनी- ०२५३ २५७४२९३ भ्रमणध्वनी- +९१९४०३९१४३७४

| पुस्तक सेवा देणगी मूल्यऐच्छिक |
|---|

| **©सर्वहक्क लेखकाचे स्वाधीन.** |
|---|

**मुखपृष्ठ, टंकलेखन, सजावट, संकल्पना**
**श्री. सुभाष भगवंतराव खर्डेकर आणि** रविकिरण एंटरप्रायझेस
**मुद्रक-**
**प्रथमावृत्ती प्रकाशन-**श्रीरामदास नवमी उत्सव-२५.०२.२०२२
**श्रीसूर्यस्थान समर्थ विद्यारोग्य केंद्र, नासिक.**(एफ- ११९३४ नासिक)‘काशिवंत’ पाटील लेन – 4, कॉलेज रोड, नासिक – ४२२००५
दूरध्वनी- ०२५३ २५७४२९३ भ्रमणध्वनी- +९१९४०३९१४३७४
**E-mail-** suhashkhardekar@gmail.com

ॐ

# श्रीरामसमर्थ

# जय जय रघुवीर समर्थ

## आपल्या देशाचा स्वातंत्र दिन


## समर्थपणेसाजरा करण्यासाठी

## देशविदेशी असणा-या

## भारतीय नागरिकांना

## समर्पित.

पूरी स्वास्थ्य की जमानत पंद्रह मीनट के भीतर. हर दिन.



SS A622



# श्री संत वेणास्वामी मठ

## ब्राम्हणपुरी, मिरज – ४१६ ४१०

॥ श्रीराम समर्थ ॥

सादर जय जय रघुवीर,

श्रीसंत वेणास्वामी मठ येथील पिठस्थ देवतांचे अनेक आशिर्वाद.

सन २०१० पासून श्रीसूर्यस्थान समर्थ विद्यारोग्य केंद्र व संत वेणास्वामी मठ यांच्या माध्यमातुन एकत्रित सूर्यनमस्कार व कीर्तन शिबीर घेतले जात आहे. आपण समर्थ सेवा म्हणून कोणताही मोबदला न घेता या शिबिरामध्ये सूर्यनमस्काराचे मार्गदर्शन करीत आहात.

सन २०१९ मध्ये नाशिक येथे नारदीय कीर्तन शिबीर श्रीसूर्यस्थान समर्थ विद्यारोग्य केंद्रात पार पडले आणि त्यानंतर नाशिक परिसरामध्ये कीर्तन करणारे व शिकणा-यांची संख्या वाढू लागली, तेव्हापासून दरवर्षी दासनवमी उत्सव आपल्याकडे सुरु झाला आहे आणि गुरुकुलातील विद्यार्थी सेवा रुपाने कीर्तन सादर करीत आहेत.

समर्थांनी बलोपासनेला मनोपासने बरोबर महत्वाचे स्थान दिलेले आहे. आपण हे सूर्योपासनेचे कार्य अव्याहत-निरपेक्ष भावनेने करीत आहात. समर्थांनी नवविधा भक्तीला समाजाभिमुख म्हणुन प्राधान्य दिलेले आहे. कीर्तन कशासाठी तर समर्थ म्हणतात-

आपुलीया सुख स्वार्था केलीच करावी हरीकथा ।
हरिकथेवीण सर्वथा राहुच नये ॥

समर्थांनी प्रत्येक महंत हा कीर्तनकार असावा ही समर्थांची अपेक्षा आहे. कारण तो समाजाध्ये राहून समाज जागृती करत असतो. हेच कार्य समर्थांचे विचार समाजापर्यंत पोहचवावेत, सुदृढ पिढी निर्माण व्हावी या हेतूने आपण श्रीसूर्यस्थान समर्थ विद्यारोग्य केंद्रा मधून हे कार्य घडत आहे.

वेणास्वामी हया पहिल्या स्त्री कीर्तनकार होत्या, त्या वेणास्वामींची चतु:शताब्दी सन २०२७ साली देशभर साजरी व्हावी या हेतुने मिरज येथील वेणास्वामी मठाच्या कार्यात आपण तन, मन, धनाने समर्पीत आहात. त्याचाच एक भाग म्हणून दरवर्षी होणारा दासनवमी उत्सव, त्या उत्सवातील समर्थांचे निर्याण कीर्तन आपण संकलीत केले आहे. सूर्योपासना आणि समर्थ चरित्र हा धागा पकडून सुंदर पूर्वरंग व उत्तररंगाची आपण उत्तम बांधणी केली आहे. या कार्यासाठी आपले कार्यकर्ते व आपण निरपेक्ष कार्य करित आहात.

सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे ।
परंतु तेथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ॥

या समर्थांच्या उक्ती प्रमाणे कीर्तन प्रशिक्षण व सूर्योपासना या कार्यासाठी आपणास समर्थ वेणीराम पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला आहे. आपल्याकडे कीर्तन अध्ययन करणारे ३०-३५ कीर्तनकारही तयार होत आहेत. आपल्या या कार्यात तरुणांनी पुढे येवुन या कार्याची व्याप्ती वाढावी व नविन पिढी बलोपासनेतून व संस्कारीत हरीभक्तीतून निर्माण व्हावी यासाठी या पुस्तक प्रकाशनासाठी मिरज येथील पिठस्थ देवतांचे आशिर्वाद व माझयातर्फे हार्दीक शुभेच्छा देत आहे.

आपल्या या कार्यात यश, कीर्ती प्राप्त होवो ही समर्थ चरणी प्रार्थना करुन माझ्या लेखणीस पूर्ण विराम देतो.

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

## लेखकाचे मनोगत

॥श्रीरामसमर्थ॥

**राष्ट्रगुरू समर्थ रामदास स्वामी यांना वयाच्या अकराव्या वर्षी (श्रावणशुद्ध अष्टमी शके १५४१) प्रभूरामरायाचा अनुग्रह मिळाला.हा अलौकिक प्रसंग समर्थांचे जांबसमर्थ येथे घडला. चारशे वर्षानंतर याच गावात हा प्रसंग (शके १९४१)मोठ्याप्रमाणात साजरा करण्यात आला. 'त्रिकालदर्शी श्री समर्थ रामदास'यास्मरणिकेचे प्रकाशन झाले.**

**सूर्यनमस्कार साधना या विषयावर लिहिलेला माझा लेख या स्मरणिकेत आहे. समर्थांचेमहानिर्वाण आणि शून्यज्ञान सूर्यनमस्कार या पुस्तकाच्या लिखाणाची सुरूवात या लेखाने झालेली आहे. हे आज लक्षात येते आहे.**

**दासनवमी उत्सवात समर्थ महानिर्वाणाचे कीर्तन सर्वत्र असते. श्रीसूर्यस्थान समर्थ विद्यारोग्य केंद्र, नासिक येथेही ते केले जाते. कीर्तन सामुदायिक असते. त्यामधीलपदे सर्वांनी एकत्र म्हणायचे. निरूपण एकाने करायचे बाकीच्यांनी ऐकायचे. मागील दासनवमीला हा 'करणे-ऐकणे' कार्यक्रम संपन्न झाला. करोनाचे १९ चे सर्व नियम पाळण्यात आले.**

**तेंव्हा लक्षातआले आख्यानात'सूर्यनमस्कार संदेश'प्रभावीपणे स्पष्ट होत नाही. लगेच आठपंधरा दिवसात ही कमतरता दूर केली.**

**श्रीसंत वेणास्वामी मठ, मिरजचे मठाधिपती समर्थभक्त परम श्रेद्धेय मा. श्री. कौस्तूभ स्वामी संस्थेमधे मुक्कामाला होते. निमित्त होते**

१आणि २ डिसेंबर २०२१ कीर्तन प्रशिक्षण वर्गाचे. त्यांच्या कडून मार्गदर्शन घ्यावे म्हणून हे कीर्तनाचे आख्यान पुन्हा वाचून काढले. एकाच बैठकीत सलग वाचन संपले. चूक लक्षात आली. विचारांती सूर्यनमस्काराचे संदर्भ कमी करत गेलो. नंतर मठाधिपतींकडून मार्गदर्शन घेतले. विचार शृंखला दोन पूर्ण झाली.

टंकलिखित मजकूर पुसून टाकणे सोपे असते. मात्र त्यातील आशय विसरणे, मनातून काढून टाकणे अशक्य असते. कारण तो आपला संस्कार असतो. जन्मो जन्मांतरीचा सोबती असतो. सखाहरि असतो. स्थूल-सूक्ष्म शरीराची पूजा करता करता हा संस्कार सिद्ध होतो. सूर्यनमस्कार साधनेचे अध्यात्मिक महत्व विश्व व्यापक आहे. तो आपला वेदकालापासूनचा वारसा आहे. आपला इतिहास आहे. समर्थांनी तो सिद्ध करून दाखविला आहे. ॲनिमेशन या माध्यमातून हा ठेवा स्पष्ट करण्यासाठी प्रयत्न होते. ते प्रत्यक्षात आले नाहीत. म्हणून 'शून्यज्ञान सूर्यनमस्कार' वेगळया पद्धतीने आपणासमोर ठेवत आहे. लवकरच युट्यूब माध्यमातूनही तो सर्वत्र प्रकाशित करण्याचा प्रयत्न आहे.

या तिनही विचार शृंखलेला प्रत्यक्ष वैयक्तिक साधनेच्या असंख्य कड्या जोडल्या जाव्यात. संत्राणे उड्डाने हुंकार वदने करत महाबली हनुमंताने आपल्या मधील शक्तीचा शोध घ्यावा. आपल्याला मात्रुभक्त करावे. मातृभूमिची सेवा करण्याची संधी द्यावी. श्रीप्रभूरामचंद्रांनी ती आपल्याकडून सिद्धकरून घ्यावी ही समर्थ चरणी प्रार्थना.

आभार:- भूषणस्वामी, शरद कुबेर, मिरज मठ, तंजावर मठ, युवराज माने, प्राचार्य डॉ. श्री. भास्कर गिरीधारी,श्री. प्रमोदराव सोनसळे तसेच प्रकाशक, टंकलेखन, मुखपृष्ठ, संस्थेचे पदाधिकारी, विश्वस्थ

प्रकाशक,टंकलेखन,मुखपृष्ठ,संस्थेचे पदाधिकारी, विश्वस्थ

**॥समर्थस्तोत्र ॥**

**भगवान श्रीधर स्वामी महाराल (<u>शार्दूलविक्रीडित</u>)**

**राष्ट्रा ऊर्जितकाल हा जरी हवा सांगे हिता चांगले |**

**लावा की जनि लक्ष या प्रभुपदी वागा जसे बोधिले |**

**राष्ट्रा सदगुरू हेचि मानुनी पदी लीनत्वि गर्जु भले |**

**विश्वोध्दारी विभु समर्थ जगती त्यांची नमी पाउले**

**||१६||**

सुभाष भगवंतराव खर्डेकर

(संस्थापक अध्यक्ष. श्रीसूर्यस्थान समर्थ विद्यारोग्य केंद्र, नासिक.)

२५ फेब्रुवारी २०२२

दासनवमी-

**॥जय जय रघुवीर समर्थ॥**

**अध्यक्ष**

**सुभाष भगवंतराव खर्डेकर**

## कीर्तन अख्यान (वाचन) करण्यापूर्वी...

मागील दशकात (सन २०१०पर्यंत) कीर्तनकारांची संख्या खूप रोडावली होती. तरूण तडफदार कीर्तनकारांची वानवा होती. कीर्तनकारांची रोडावणारी संख्या मिरज येथील समर्थ मठाला अस्वस्थ करणारी होती.

समर्थशिष्या संत श्रीवेणास्वमी मठ मिरज यांना राष्ट्रगुरू समर्थ रामदास स्वामी यांनी उभेराहून कीर्तन करण्याची परवानगी दिली

होती. तेंव्हा पासून या मठाची कीर्तन परंपरा अव्याहतपणे चालू आहे. समर्थभक्त आदरणीय कौस्तुभस्वामी महाराज विद्यमान मठाधिपती आहेत. दररोज  कीर्तन करणे किंवा ऐकणे हा त्यांचा स्थाईभाव होता आणि आजही आहे.मिरज मठामध्ये २०१० पासून मे महिन्यात सुटीध्ये सर्वांसाठी कीर्तन प्रशिक्षण देण्यास सुरूवात केली. सूर्यनमस्काराचे प्रशिक्षण माझेकडे असायचे. दोन्ही प्रशिक्षण विनामूल्य आसायचे. मला वाटते प्रत्येक वर्षी एक महिनाभर कीर्तनाचे प्रशिक्षण, तेही सर्व वयोगटातील स्त्री-पुरूषांसाठी आणि विनामूल्य देणाराहा पहिलाच आणि एकमेव मठ असणार.श्रीसंतवेणास्वामी मठ, मिरज येथे कीर्तन प्रशिक्षण घेलेले  २५० पेक्षा जास्त कीर्तनकार आज अधिकार वाणिने समाज प्रबोधनाचे कार्य करताहेत. इंटरनेटवरील **अखिल भारतीय समर्थ वेणीराम कीर्तनगुरूकुल**या माध्यमातून कीर्तन विद्येचा प्रचार-प्रसार उठावदार होतो आहे. नवीन तडफदार कीर्तनकार तयार होताहेत. सन २०२७ मध्ये समर्थ शिष्या वेणास्वामी यांची जन्म चतुःशताब्दी उत्सव साजरा करायचा आहे. त्यावेळी चारशे कीर्तनकार मिरजमठात एकत्र यावेत अशी अपेक्षा आहे.

श्रीसूर्यस्थान समर्थ विद्यारोग्य केंद्र, नासिक येथे दासनवमीचे कीर्तन होते. (कीर्तनाची पद्धत पुढे दिलेली आहे.) मागील वर्षी किर्तन चालू असतांना या आख्यानात सूर्योपासनेला योग्य स्थान दिलेले नाही. हे लक्षात आले. आख्यानात दुरूस्ती आवश्यक आहे हा विचार पक्का झाला. दोन आठवड्यात हा संकल्प पूर्ण झाला.डिसेंबर २०२१ मिरज मठाधिपती मा.स.भ.कौस्तुभस्वामी कीर्तन प्रशिक्षण वर्ग घेण्यासाठी संस्थेमध्ये मुक्कामाला होते. त्यांचे मार्गदर्शन घेण्याचे उदेशाने आख्यान पुन्हा वाचले. सूर्यनमस्काराने फारच जास्त जागा व्यापली होती.लगेच एकदोन दिवसात अनावश्यक असलेला बराच भाग काढून टाकला.

कागदावरून काढून टाकणे सोपे असते. मनाला श्रेयश वाटणारी गोष्ट कल्पांतापर्यंतची आठवण असते. यालाच आपण संस्कार म्हणतो. तो विसरणे अशक्य असते. (सूर्यो)पासना आणि सावधानता हा

समर्थकार्याचा मुख्य आधार.या अधिष्ठाणाच्या मदतीनेत्यांनीप्रपंचविज्ञ देशभर प्रक्षेपित केले. महाराष्ट्रातअपेक्षित वर्तन- परिवर्तन घडण्यास सुरूवात झाली. समाजमन सजग झाले. स्वराज्याची भावना दृढ होत गेली.

हा वारसा हक्क आपण जपणे ही आजच्या काळाची गरज आहे. म्हणूनच **शून्यज्ञान-सूर्यनमस्कार** अतिसंक्षिप्त स्वरूपात स्वतंत्रपणे या पुस्तिकेत समाविष्ट केलेलाआहे.

## कीर्तन अख्यान पद्धती

- राष्ट्रगुरू समर्थ रामदास स्वामी महाराजमहानिर्वाण महोत्सवाचे निमित्ताने प्रत्येक घरात त्यांचे स्मरण कीर्तन माध्यमातून व्हावे. ही आग्रही अपेक्षा आहे.
- कीर्तन अख्यान पूवार्ध आणि उत्तरार्ध अशा दोन भागात असते.
- जो विषय चर्चेला घ्यायचा त्याला अनुसरून मूळपद/अभंग/श्लोक असतो.
- विषय स्पष्ट करण्यासाठी इतरही अनेक पदे, श्लोक,ओव्या,कथा, दृष्टांत येतात.
- या सर्वांचे रोचक,रंजक,करूण भावनेला जागे करणारे, खुमासदार, चुरचुरित गद्य विवेचन केलेले असते.
- ज्यांना गायनाच अंग आहे त्यांना १ ते १३ क्रमांकाचे पदे म्हणण्यासाठी माईक हातात द्यावा. त्यांचे बरोबर अथवा त्यांचे नंतरइतरांनी ते म्हणावेत.
- श्रोत्यांचा सहभाग आवश्य घ्यावा. तालासुरात, मोठ्याने दीर्घ स्वरात पदांचा उच्चार केल्याने मंत्रोच्चारित प्राणायाम होणार आहे. शरीर-मनाला आलेला थकवा, आळस, झोप दूर करण्यासाठी हे आत्यावश्यक आहे.

- ज्यांचे बोलणे शुद्ध स्पष्ट आहे, बोलतांनाही देहबोलीचा वापर सहजपणे करणारे, गोष्ट रंगवून सांगणारे असे कोणी असल्यास गद्य भागाचे विवेचन करण्यासाठी त्यांचेकडे दुसरा माईक द्यावा.
- याच प्रमाणे उत्तरार्धाचे नियोजन करावे.
- सर्व अख्यान एकसूरी होऊ नये यासाठी दोन / तीन जोड्या तयार कराव्यात.
- कार्यक्रमात ऋणनिर्देश,सत्कार, आभार, उल्लेख झाल्यावर प्रत्येक वेळी ||जय जय रघुवीर समर्थ||जय घोष करावा. एका श्वास तीन टप्प्यात सोडत करावा. पहिला टप्पा छाती मोकळी, दुसरा पोट मोकळे. तिसरा टप्पा नाभी वर उचलली जाते. याकडे लक्ष द्यावे.

5 वेळेचे भान ठेऊन अख्यानाचा भाग कमी जास्त करावा.

- निवेदन करणारे आणि पद गाणारे यांनी एक-दोनदा सराव करावा.

||जय जय रघुवीर समर्थ||

॥श्रीरामसमर्थ॥

# राष्ट्रगुरू समर्थ रामदास स्वामी महाराज महानिर्वाण

श्रीमन् महागणपतये नमः। श्रीसरस्वतैय नमः। श्रीगुरवे नमः ।

**ब्रह्मानंदम् परमसुखदम् केवलम् ज्ञानमूर्तीम् ।**
**द्वंदातितम् गगनसदृशम् तत्त्वमस्यादिलक्षम्।**
**एकंनित्यम् विमलमचलम् सर्वधिसाक्षिभूतम्।**
**भावातितं त्रिगुणरहितम् सदगुरू तम् नमामि ॥**

गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा। मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा॥
नमूं शारदा मूळ चत्वार वाचा।गमूं पंथ आनंत या राघवाचा॥१॥

शुका सारखे पूर्ण वैराग्य ज्याचे।वशिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचे।
कवि वाल्मिकासारिखा मान्य ऐसा।नमस्कार माझा समर्थ सद्गुरू रामदासा।

वृदावनासी बहू शांत काया।चाफा फुलला बहू वेडी निष्ठा।
समाधिवरी वर्षत आहे गुरूला ।नमस्कार माझा समर्थ वेणापदाला।

जगी धन्य ही टाकळी पुण्यभूमी।अनुष्ठान केले असे राम नामी ।
असंख्यात सामर्थ्य गोमय मारुतीचे।गोदा तटी स्थान हे जागृतीचे ।

## नमनपद

रामा हो जय रामा रामा

रामा हो जय रामा रामा ।पतितपावना पूर्ण कामा।रामा हो जय रामा रामा ।

नाथा हो दीनानाथा नाथा ।तुमचे चरणी राहो माथा ।रामा हो जय रामा रामा ।

बंधू हो दीन बंधू बंधू ।रामदास म्हणे करूणासिंधू ।रामा हो जय रामा रामा ।

रामदास माऊली दया करी ।

वत्सा लागे धेनू जैसे।करी करूणा साऊली दया करी।रामदास माऊली दया करी

मदन्त पाहू नको त्वरित ये।ये उचलीत पाऊले दया करी।रामदास माऊली दया करी

जयरामात्मज तनया वरी करी।सुखकर करी साऊली दया करी।रामदास माऊली दया करी रामदास माऊली दया करी

**भजन**

**रघुपती राघव राजा राम।पतित पावन सीताराम ।**

**जानकी वल्लभ राम राम। सुंदर माधव मेघःशाम॥**

**॥जय जय रघुवीर समर्थ॥**

**॥राष्ट्रगुरू समर्थरामदास स्वामी महाराज की जय॥**

**॥महारूद्र हनुमान की जय॥**

**॥श्रेष्ट गंगाधर स्वामी महाराज की जय॥**

**॥सद्गुरूश्रीउद्धवस्वामी महाराज की जय॥**

**॥सद्गुरूश्रीभूषणस्वामी महाराज की जय॥**

**॥सद्गुरूश्रीकौस्तुभस्वामी महाराज की जय॥**

**॥सब संतनकी जय॥**

**आर्य सनातन वैदिक धर्मकी जय॥**

**॥जय जय रघुवीर समर्थ॥**

**मूळपद**

**तुझा भाट मी वर्णितो रामराया।सदा सर्वदा गाय ब्रिदे सवाया ।**

**महाराज दे अंगीचे वस्त्र आता।बहुजीर्ण झाली देहे बुद्धी कंथा॥**

**श्लोक**

आपदामपहर्तारं दातारं सर्वसम्पदाम ।
लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो नमाम्यहम।।

तुम्ही श्रोते जगदीश मूर्ती। तेथे माझी व्युत्पती किती।
बुद्धीहीन अल्पमती ।सलगी करितो।
व्युत्पत्ती नाही कला नाही । चातुर्य नाही प्रबंधनाही।
भक्ती ज्ञान वैराग्य नाही । गौव्यता नाही वचनाची।
ऐसा माझा वागविलास ।म्हणोनि बोलितो सावकाश।
भावाचा भोक्ता जगदीश ।म्हणेनिया।

अनेन प्रियताम देवो भगवान जानकी पतीः।
श्रीराम चन्द्रपूर्वेषाम आस्माकं कुलदैवतम।

श्रोता वक्ता श्रीराम समर्थ ।श्रीराम समर्थ श्रीराम ।

आदिनारायणं विष्णुं ब्रह्माणं च वशिष्ठकम् ।
श्रीरामं मारुतिं वंदे रामदासं जगद्‌गुरुम्॥

अखील गुणनिधान भक्त वत्सल परमात्मा श्रीराम ,उपास्य दैवत मारूतीराय,सद्‌गुरू समर्थ रामदास स्वामी महाराज, सद् गुरू संत वेणास्वामी महाराज, ज्या स्थानावर ही समर्थ सेवा सुरू आहे त्या स्थानावरील सर्व अधिष्ठित देवीदेवता, उपस्थित असलेले (सर्व किर्तनकार,प्रवचनकार,वैदिक, पुराणिक,)उपस्थित सर्व श्रोते या सर्वांच्या हृदयस्थ पदमात्म्याला वंदन करून आजच्या कीर्तन सेवेला प्रारंभ करूया.

## मूळपद

तुझा भाट मी वर्णितो रामराया। सदा सर्वदा गाय ब्रिदे सवाया ।

**महाराज दे अंगीचे वस्त्र आता। बहुजीर्ण झाली देहे बुद्धी कंथा॥**

समर्थांच्या मनात देहत्यागाचे विचार येतात. श्रेष्ठांचे निधन,वेणास्वामींचे माहेराला जाणे, छत्रपतींची संगत अकाली संपणे. या घटनांचा एकत्रित परिणाम असेल. निर्णय पक्का झाला. विचारांना गती मिळाली. तपोभूमी टाकळी नासिक येथिल प्रथम मठाची आठवण झाली. तेथील साधना- सूर्यनमस्कार, गायत्रीपुरश्चरण,तारकमंत्राचा जप, वाल्मिकी रामायणातील बालकांड, तेथील सवंगडी, सहाध्यायी, नासिककर डोळया समोर आले. उत्कट आठवणींच्या सागर लाटा मनात उचंबळून येत होत्या. त्रयस्थपणे समर्थ त्या पहात असणार.

निश्चित उद्दिष्ट ठेऊन भारत भ्रमणाला सुरूवात केली. या निमित्ताने रामरायाच्या वनवासातील पाऊलखुणांवर चालत उद्वस्थ समाजमनाचा मागोवा घेत देशभर पदयात्रा केली. सर्वत्र एकच परीस्थिती अस्मानी सुलतानी संकटेआपल्याला टाळता येणार नाहीत. यातून आपल्याला देवच तारून नेईल. या विश्वासाने हातावर हात ठेऊन अलौकिक घडेल याची डोळयात प्राण आणून वाट पहात होते. सर्वत तोच भरून उरलेला आहे. सर्वजीव त्याचीच प्रजा आहे.या वैश्विक कुटुंबाचा मी एक भाग आहे. **<u>ठेविले अनंते तैसेची रहावे चित्ती असोद्यावे समाधान.</u>** याचाच जप करत प्रत्येकजण मरेपर्यंत जगत होता. प्रत्यक्षात समाजातील सुख-शांती पूर्णताः नष्ट झाली होती. जन्म-मृत्यूचे क्रूर तांडव सर्वत्र सुरू होते. अध्यात्मातील महावाक्ये जशीच्या तशी आचरणात आणल्या मुळे हिंदूसमाजाची,हिंदू संस्कृतीची,हिंदू स्वराज्याची केविलवाणी अवस्था झाली होती. अशा परिथितीत दैन्यवाणे जीवन जगणा-या हिंदुंना देशप्रेमाने भारित करणारा नेता आवश्यक होता.स्वराज्याचे स्वप्न साकार करणाराण्यासाठी मार्गदर्शन करणारे व्यक्तीमत्व आवश्यकता होते. नारायणाने स्वताची ओळख रामाचा दास म्हणून प्रस्थापित केली होती.स्वराज्ज्यासाठी

समाजकारण सुरू केले. मारूती रायांनी स्थापन केलेल्या स्वरूप संप्रदायाचा  पहिला मठ चाफळ येथे स्थापन केला. हाच संप्रदाय पुढे रामदासी संप्रदाय म्हणून प्रसिद्ध झाला. महाराष्ट्रातील लोकांनी एकत्र यावे, आपला हिंदूधर्म वाढवावा. रामराज्याची स्थापना करावी. रामराज्याचा विस्तार संपूर्णभारतातच नव्हे तर सर्व जगात व्हावा हे उद्दिष्ट ठेऊन कार्यारंभ केला.  मराठा तितुका मेळवावा/ आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा/ ये विषयी न करिता तकवा/ पूर्वज हासती//

हे प्रत्यक्षात आले नाही तर हिंदू माणूस, हिंदू संस्कृती व हिंदू राजा शिल्लक रहाणार नाही. मागील पिढीने इतिहासाकडून बोध घेतला नाही. त्यांनी नाकर्तेपणानेप्रयत्न वाद स्वीकारला नाही. म्हणून ते नरक यातना भोगता आहेत. आपणही तीच चूक केली तर ते उपहासाने उपहासाने हसतील. आपल्याला वर्तमान आणि भविष्यातही नरकयातनाच भोगावी लागेल. ही जाणिव सामान्य लोकांपर्यंत नेण्यासाठी अतीव करूणेने रामरायाला समर्थांनी सदोदित आळविले-आर्जविले.आजही ही करूणाष्टके शब्दाच्या अर्थाकडे लक्ष देत, मनापासून, दीर्घस्वरात, मोठ्याने म्हटले तर समर्थांच्या काळात उतरता येते,समाजाची उद्वस्थ अवस्था लक्षात येते, आपल्या डोळयात पाणी येते, कंठदाटून येतो. यातून बाहेर पडण्यासाठी भक्तीपंथेची जावे हे समर्थ किती आर्तपणे विनविताहेत हे कळेल. या प्रार्थनेतील आर्तता व करूणा ऐकून रामरायाने तथास्थू हा आशीर्वाद दिला. असंख्य  लोक संप्रदायाच्या झोंड्याखाली एकत्र आले.  त्यांना ऐकीने एकत्र बांधण्यासाठी एक मंत्र दिला.

**सूर्यासि करावा नमस्कार/ देवासि करावा नमस्कार/सद्गुरुसि करावा नमस्कार/ साष्टांग भावे/**

या नमस्कारा मुळे त्रिदोष नष्ट होतात. त्रिगुण पुष्ठ होतात. शरीरातील बलसंवर्धन वाढले की मन-बुद्धी-अहंकार गळून

पडतात.स्थूल देहाने सूर्यनमस्कार घालूनसूक्ष्म देहीची पूजा करा. स्थूलाच्या पलीकडे लपलेले शून्य ज्ञान म्हणजेच सूक्ष्मतत्त्व/ रामचैतन्य/सौरऊर्जा याची दररोज नव्याने ओळख करून घ्या. बोलणारा-ऐकणारा, तू आणि मी, गुरू-शिष्य, देव आणि भक्त यांचे ऐक्य साधा. त्यासाठी मरूताचा, पवनपुत्राचा, प्राणनाथाचा आधार घ्या.

**समर्थाचिया सेवका वक्र पाहे।**
**असा सर्व भूमंडळी कोण आहे॥**
**जयाची लिळा वर्णिती लोक तीन्ही।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥३०॥**

रामरायांचा सेवक म्हणजे मारुतीराय, शक्तीचे प्रतिक. समर्थ म्हणजे सूर्यकुलातील सर्वश्रेष्ट राजा प्रभुरामचंद्र. महाराज तो स्वामी वायुसूताचा/ जना उद्धरी नाथ लोकत्रयाचा//सर्वभवाचा, जीवांचा उद्धार करणारे आपले सर्वस्व असणारे, अराध्य असणारे म्हणजे रामचैतन्य. प्रत्येक पेशीत असणारे रामचैतन्य मृत्यूहि आनंदमय करते. नव्हे नव्हे धडावर शीर नसतांना शत्रूसैनिकांना यमसदनास गारद करीत तोफांचे आवाज येईपर्यंत आपल्या स्वामींचे रक्षण करते. हा आपला इतिहास आहे. पितामह भिष्माचार्यांनी शरशय्येवर असतांना श्रीविष्णूसहस्रनामाचा उच्चार करून भगवंताची स्तुती केली. त्यांना नमन केले. हा आपला वारसा आहे. हा वारसा हा ईतिहास दरररोज जागता ठेवण्याचा प्रयत्न सूरू झाला.

सूर्यकुलातील आपण सर्व सूर्याचीदेवाची प्रजा आहोत. सूर्य उगवला की जागे होतो. मावळला की झोपतो. विश्रांती घेतो. व्यक्त-अव्यक्त किंवा जागे असणे नसणे किंवा जाणीव असणे- नसणे हे दैनिक आवर्तन झाले. जन्म-मृत्यूचे आवर्तन काळाच्या तुलनेत मोठे येवढाच फरक.

**मही निर्मिली देव तो ओळखावा/**
**जया पाहता मोक्ष तत्काळ जीवा//**

पृथ्वीचा निर्माण कर्ता ओळखण्याचा प्रयत्न करा. एका आकाश गंगेत हजारो सूर्य मालिका आहेत. असंख्य आकाशगंगा आहेत. हे कोट्यावधी ग्रह-गोल-तारे यांना स्वतःची गती आहे. आपल्या ठरवून दिलेल्या कक्षेत ते स्वतःभोवती व सूर्याभोवती प्रदक्षिणा घालत असतात. त्यांची कधी टक्कर होत नाही. त्यांचे सारथ्य परमतत्त्व असलेले रामचैतन्य करीत असते. अशा या निर्गुण परमेश्वराला ओळखण्यासाठी  त्यानी निर्माण केलेली अलौकिक व्यक्तीमत्व शोधा, त्याचे गुण बघा, अनुभूती घ्या. परमतत्त्वाचे आकलन-आस्तित्व नक्की कळेल. तो कळला की मोक्ष तत्काळ. त्यासाठी माशाला पाण्याबाहेर काढण्याची जरुरी नाही.

मरूत आणि प्राण, वायू आणि ज्योत यांच्या शरीरातील संयोगाला प्राणतत्त्व,रामचैतन्य म्हणतात. शरीरात हे प्राणतत्त्व, रामचैतन्य श्वासावर अवलंबून असते. दीर्घ श्वासामुळे संपूर्ण आरोग्य अनुभवायला मिळते. शाररिक- मानसिक तसेच बौद्धिक रोग- व्याधी- विकार- व्यसन दूर होतात.जीवरूपी परमेश्वराच्या विभूतींची सेवा करण्यासाठी, देव-देश-धर्माचे कार्य करण्यासाठी अधिक प्राणतत्त्वाची जरूरी असते. त्यासाठी सतत उपासना साधना करणे गरजेचे असते.

समर्थांनी मारूतीची शक्ती व प्राणाचे सामर्थ यांची उपासनाझाली. रामरायाचा आशीर्वाद मिळाला. इतरांकडूनहीप्राण- शक्तीची उपासना करून त्यांनाही ही अनुभूती दिली. एकत्रितपणे कार्याला यश मिळाले. हिंदवी स्वराज्याची स्थापना झाली. श्रीगणेशा झाला. अद्याप खूप काम बाकी आहे. सुरूवात हरिकथा,राजकारण,सावधपण, साक्षेपचतुःसूत्राने झाली. यातील गुह्यज्ञान भारतीयांच्या आचरणात राहील का/ लोक साधना करतील का/ ऐक्य व सामंजस्य समाजात रुजेल का/ आपला परका ओळखता

येईल का/ इत्यादि विचारांनी मन उदास होत होते.रामरायाला विनवितात...

**कल्याण करी रामराया जनहित विवरी || धृ ||**

**तळमळ तळमळ होतची आहे हे जन हाति धरी || १ ||**

**अपराधी जन चुकतची गेले तुझा तूचि सावरी || २ ||**

**कठीण त्यावरी कठीणची जाले आतां न दिसे उरी || ३ ||**

**कोठे जावे काय करावे आरंभिली बोहरी || ४ ||**

**दास म्हणे आम्ही केले पावलो दयेसी नाहीं सरी || ५ ||**

तू दयानिधी आहेस. वाट चुकलेल्यांना प्रगतीपथावर आणणारा आहे. पण आमचेच गुरूबळ कमी पडते. रामर्चतन्य कमी पडते. श्वास अपरा होतो. त्यामुळे हा देह आणि देहबुद्धी आम्हाला हीन- दीन- दरिद्री बनवते. मन बुद्धीचे दिवाळे काढते. बुद्धी मनाला धाब्यावर बसविते. शरीर फक्त रक्तमासाचे आहे. त्याला अक्कल-हुशारी शून्य आहे. मन-बुद्धीला त्याने अंकित केलेले आहे. तेही देहाचे दास झालेले आहे. रामराया तू भक्तांचा पालनकर्ता आहेस. या शरीरधर्माच्या जाचातून आम्हाला मुक्त कर. विवेक वैराग्याची सत्ता मन-बुद्धीवर प्रस्थापित कर. रामराया तुझीच वासना अंतकाळापर्यंत मनी असावी. सुखे सांडणे या देहाचे करावे.

देहात मी आहे म्हणून देह माझा असे म्हणता येते. याचा अर्थ देह म्हणजे मी असा होत नाही. माझे पेन, माझे दप्तर, माझे पुस्तक, माझी कपबशी, हे खराब होते, फाटते, तुटते, फुटते, नष्ट होते, संपते. आपले वयवर्षे पुढे सांडत असतात. म्हणूनच माझे शरीर माझ्या आत्मोन्नतीसाठी वापरता आले पाहिजे. त्याला तयार करणे, वापरणे, त्याच्या कार्याची प्रचिती पहाणे या क्रीया उघड्या डोळयांनी करायच्या असतात. त्यांची प्रचिती अनुभवायची असते. मनी धरावे ते होते। विघ्न अवघेचि नासोन जाते । कृपा केलिया रघुनाथे । प्रचित येते॥॥

**हिणाहून मी हीण जेसा भिकारी| दीनाहून मी दीन नाना विकारी|**
**पतितांसि रे आणि हाती धरावे| समर्था तुझे काय उत्तीर्ण व्हावे||१||**
**जनी भक्ती नाही मनी भाव नाही | मला युक्ती ना बुद्धी काहीच नाही|**
**कृपाळूपणे राज्य रंकासीद्यावे| समर्था तुझे काय उत्तीर्ण व्हावे||२||**
**बहूसाल अन्याय कोट्यानुकोटी| रघुनायके घातले सर्व पोटी|**
**किती काय म्या गुणासी आठवावे| समर्था तुझे काय उत्तीर्ण व्हावे||३||**
**समर्थे दिल्हे सौख्य नानापरिचे| सदा सर्वदा जाणसी अंतरीचे|**
**बळे पाळिले तू कृपाळू स्वभावे| समर्था तुझे काय उत्तीर्ण व्हावे||४||**
**दीनानाथ हे ब्रीद त्वा सार्थ केले| म्हणे दास भक्तासि रे उद्धरीले|**
**सुखे सांडणे या देहाचे करावे| समर्था तुझे काय उत्तीर्ण व्हावे||५||**

# ॥उत्तरार्ध॥

## <u>बोधकथा- ब्रह्मपिसा</u>

छत्रपतींनी दिलेली तरवार- उषाशी- सकाळी दर्शनासाठी शिष्य आले- समर्थ केस मोकळे- हातात तलवार- कपडे फाटलेले-डोळे लाल- रुद्रावतार- धाऊन जाणे- खांडोळी करतो-मारून टाकतो- जीव घेतो- सर्व पसार झले- कल्याण स्वामींना कळाले- ते आले- समर्थांचा पारा वाढला- कल्याण स्वामी पुढे सरकत होते-आत्म विश्वास-मरण मोक्षदाशी- मीपण/जाणिव संपेल-रामी रामात लीन -पायावर डोके टेकविले- खांडोळी करतो- आपली इच्छा मी पाय सोडणार नाही- सिद्ध- वार अपेक्षित- लोखंडाचा दगडावर पडणे- खांदे धरून उठविले- अलिंगन दिले. परतताना अध्यात्मपर पदाची रयना- कृती क्रियाचे रूप शेंडी मोकळी- रामनामाच्या आरोळया ढोकतो- संसाराची राखरंगोळी करून अंगाला फासतो- इ. रूपकाची मांडणी---

## <u>बोधकथा- विचित्र वीर्य</u>

मंदिरातील मूर्ती- प्रभावळ- मध्यभागी फक्त मुखाचे शिल्प- भगवंताने काही महत्वाचे कार्य करून घेण्यासाठी संकल्पाने मानव देहधारी निर्माण केला- कार्य संपले काय करू? हा प्रश्न संपेना- खा तुलाच- आज्ञा शिरसावंद्य- देहे कारणी सर्वलावित जावे- आर्शीवचन- देवाचे दर्शन घेण्याअगोदर भक्त तुला वंदन करतील. देहे कारणी सर्वलावित जावे।

मी फक्त आणि फक्त तुझाच कार्यकर्ता आहे. तुझाच भाट आहे. तूच माझे सर्वस्व असहे. आराघ्य आहे. तू संदेश देतो आहे त्याप्रमाणे मी कार्य करतो आहे. किती जन्म झाले, कीती युगे झाले त्याची गणनाच नाही. या आत्मसुताचे शरीर जीर्ण झाले आहे. तुझ्यात सामावून घे. आकाश- अवकाशाच्या पांघरुणात मला घे. **मजवीण जू मज देरे राम**

**मूळपद**

**तुझा भाट मी वर्णितो रामराया। सदा सर्वदा गाय ब्रिदे सवाया ।**

**महाराज दे अंगीचे वस्त्र आता। बहुजीर्ण झाली देहे बुद्धी कंथा॥**

**जपध्यान पावना रामा पतीत पावना रामा**
**पावना रामा पतीत पावना रामा ....**

निस्पृहता-मजवीण तू मज दे रे राम/ हेच माझे सदैव तुझ्याकडे मागणे होते. मला कोणतीही उपाधी नको होती. तुझ्यामध्ये एकरूप होण्याचाच माझा सतत प्रयत्न होता. तूमात्र माझे निहित कार्य सांगित गेला आणि ते तुझे कार्य आहे म्हणूनमी करीत गेलो. तुझ्यामुळेच माझी निस्पृहता हतबल झाली. उपाधीप्रती माझे असलेले वैराग्य कमी पडले. आता उपाधिरहित असलेल्या तुझ्या विराट स्वरूपात विलीन व्हायचे येवढीच इच्छा आहे. महाराज दे अंगीचे वस्त्र आता/ बहु जीर्ण झाली देहबुद्धिकंथा/

**माझी निस्पृहता गेली तुझा पाई| ती मज परत देई रामराया||**

**<u>नलगे संप्रदाय न लगे वैभव| माझा अंतर्भाव उच्चाटिला||</u>**

रामरायाच्या आज्ञेप्रमाणे त्याच्याच माध्यमातून परमार्थाचेराजकारण केले. प्रत्येकाच्या शरीरात असलेल्या मासपेशीतील रामचैतन्याला जागवले. देहभान सोडा. शरीरशक्ती वाढवा. शरीरातील प्राण मरुताच्या उपासनेतून वाढतो. त्यामुळे शरीराची शक्ती वाढते. मन शांत-स्थिर होते. त्याला बुद्धीची साथ मिळते. मरूताची मेंदूवर असलेली सत्ता मनस्वी स्वीकारली जाते. अष्टसिद्धी- नवनिधी च्या पलीकडे असलेलेसतरावे ऊड्डान मारुतीच्या सहाय्याने घेण्याचा प्रयत्न करते. <u>रामी रामदासा शक्तीचा शोध</u>रामरायाने माझ्या शक्तीचा विस्तार करूनप्रपंचातील परमार्थाचे ज्ञानद्यावे. त्याची अनुभूती मला उघड्या डोळयांना मिळावी.

**<u>मनी धरीले ते होते/ विघ्न अवघेची नासून जाते/ कृपा केली रघुनाथे/ प्रचित येते//</u>**

याची प्रचिती मला मिळाली. तुझ्या परीक्षेत उत्तीर्ण झालो. मी धन्य झालो. इतरांचे काय?रामराज्याची सुरूवात झालेली आहे. ते विश्वव्यापक व्हावे. चंद्रार्काप्रमाणे सनातन रहावे. प्रत्येक नागरिक त्याचा पायिक व्हावा. यासाठी समर्थ पसायदान मागत आहेत.

**<u>ज्याला वाटते सुखी व्हावे/त्याने रघुनाथ भजनी लागावे/</u>** ही ओवी सर्वश्रूत आहे. सर्वमान्य आहे. सूर्यकुलात असलेल्या रघुकुलातील राजाधिराज रामचंद्र महाराज ही आपल्यासाठी वैश्विकशक्ती / सौरऊर्जा किंवा श्रीराम- श्रीशीवशंकर- भगवान विष्णू यांना ओळखण्यासाठी एक खूण आहे. या खुणा किंवा नावाचे फलक अनेक आहेत- सौरऊर्जा, वैश्विकशक्ती, प्राणतत्त्व, गुरूतत्त्व, पंचप्राणसूर्यतेज इत्यादी... ज्या ज्या ठिकाणी या खुणांचा संदर्भ येतो तेथे समर्थ आणि सेवक, सद्‌गुरू आणि शिष्य, राम आणि मारुती, आत्मा परमात्मा हा अन्वयार्थ लक्षात घेऊन शरीरातील मासपेशींमधील प्राणतत्त्व मजबूत करणे हे अपेक्षित आहे.आपले प्रयत्न कसे सिद्ध होतील यासाठी समर्थांनी

आपल्या सर्वांच्या उद्धारासाठी श्रीरामरायाकडे पसायदान मागितले. तथास्तू आशीर्वाद मिळाला. दास झाला सुख संपन्नझाला/

**आज्ञेप्रमाणे परमार्थ| केला जाण म्या येथार्थ ||१||**

**अता देहाचा कंटाळा| आला असे जी दयाळा ||२||**

**आहे येकची मागणे| कृपा करोनिया देणे ||३||**

**ज्यासी दर्शनाची ईच्छा| त्याची पुरवावी आस्था ||४||**

**ऐक सखया वचन| त्यासी देईन दर्शन||५||**

**तेरा अक्षरिया मंत्राचा| जप करील तो साचा ||६||**

**त्याची संख्या तेरा कोटी| होता भेटेन मी जगजेठी ||७||**

**भय न धरावे मनी| बहु बोलिलो म्हणोनी ||८||**

**नलगे आसना बैसावे| नलगे अन्नही वर्जावे ||९||**

**येता जाता धंदा करता| जपसंख्या मात्र धरिता||१०||**

**येका तेरा कोटीत चि| पापनाशन जन्मांतरींची ||११||**

**मग तयासी दर्शन| देऊनि मुक्त त्या करीन ||१२||**

**ऐसा वर होता पूर्ण| दास झाला सुख संपन्न ||१३||**

देहत्यागाचे पंधरा दिवस अगोदर समर्थ आपल्या शिष्यासमवेत बसले होते. बोलणे चालू होते. समर्थांचे बोलणे सूचक होते. अप्रत्यक्षपणे स्वतःच्या निर्याणाची तयारी करीत होते. श्लोकाच्या पहिल्या दोन ओळी त्यांनी सांगितल्या. थांबले. सर्व शिष्यगणावर नजर फिरविली.

**रघुकुलटिळकाचा वेध सन्निध आला|**

**तदुपरी भजनाचा पाहिजे चांग केला|**

जमलेल्या शिष्य परिवारात आगर टाकळी नासिक येथील समर्थ मठाचे प्रथम मठाधिपती उद्धवस्वामी महाराज होते. त्यांचे विचारचक्र सुरू झाले. सद्गुरूंना शरीररुपी घटातील प्राणाकाशवैश्विकप्राण

चैतन्यात विरून जाण्याचे वेध लागले आहेत. गुरूतत्वाशी रामचैतन्याशीएकरूप होण्यासाठी अधीर झाले आहेत. उपाधीरहित असलेल्या- काळ,काम,वेळ, आकार, अस्तित्व,गुण-निर्गुण किंवा इतिहास-भूगोल- संस्कृती याचेही पलीकडे असणारेजे परमतत्त्व/ परमेश्वर यामध्ये विलिन होण्याचा निर्णय झालेला आहे. म्हणूनच हा विषय युक्तीने सर्वांच्या समोर ठेवलेला आहे. या विषयाचे संदर्भात पंचागातसांगितलेला नजिकचा सुमूहूर्त कोणता?कशासाठी असणार? लगेच उत्तरही सापडले. चेह-यावर आश्चर्य, प्रश्नचिन्ह आणि अतीव दुःखाचे भाव आले. समर्थांची दृष्टी आपला प्रथम शिष्य, ज्याची मुंज त्यांनी आपल्या मांडीवर लावली होती,त्याचचेकडे वळली. 'काही कळाले का?' हा भाव त्यांच्या डोळयात असणार.उद्धवस्वामी महाराजांनी मोठ्या आवाजात पुढील श्लोक पूर्ण केला.

**रघुकुलटिळकाचा वेध सन्निध आला|**
**तदुपरी भजनाचा पाहिजे चांग केला|**
**अनुदिन नवमी हे मानसी आठवावी|**
**बहुत लगबगीने कार्य सिद्धी करावी ||**

तंजावर येथील अंध कारागिर श्री. अरणीकर प्रसिद्ध मुर्तिकार. त्यांनी श्रीराम-लक्ष्मण- सीतामय्या आणि हनुमान यांच्या पंचधातूंच्या मूर्ती तयार करण्याचे मान्य केले.त्यांच्या अंतःचक्षूंना भासमान झालेले विधात्याचे दिव्य स्वरूप प्रत्यक्ष साकारण्यासाठी समर्थांनी मुर्तिकार यांना चर्मचक्षू प्रदान केले. त्यांची स्थूल दृष्टी जागविली.

मूर्तीसाकार झाल्यानंतर त्यांनी समर्थांना विनंती केली- उरलेल्या आयुष्यामधे फक्त आणि फक्त श्रीरामरायाचे रूपच कायम स्वरूपी माझ्या अंतःकरणात असावे. इतर दृष्य सृष्टीवद्दल मला पूर्ण वैराग्य द्यावे. मला फक्त सूक्ष्मचक्षू असावेत. मला भव-भय-भ्रम यातून मुक्त करावे. टाळ-मृदुंगाच्या तालावर भक्ती-भजनाचे सूर आळवीत

ब्रह्मानंदाची अखंड प्राप्ती व्हावी हाच आशीर्वाद मिळावा. ही विनंती केली असणार.

निर्वाण दिनाचे अगोदर पाच दिवस,माघ वद्य पंचमीला, या मूर्ती सज्जनगडावर येऊन पोहचल्या. परळीगड सज्जनगड झाला. सज्जन हे विशेषण आहे. चांगला माणूस, साधूपुरूष, देवमाणूस इत्यादी अर्थाने वापरला जातो. सज्जन शब्दाच्या समग्र भावछटा मनोबोधातील २०५ श्लोकातून व्यक्त होतात. अगदी **<u>मना सज्जना भक्ती पंथेचीजावे</u>**या दुस-या श्लोकापासून ते **<u>मनाचीशते ऐकता दोष जाती-</u>** शेवटचा श्लोकापर्यंत सज्जन शब्दाची व्याख्या, व्याप्ती व उपयुक्तता स्पष्ट होते.

माझे मन,माझी जाणिव, स्थूल-सूक्ष्म शरीरात बांधलेली आहे. हे ज्याला कळतं त्या सर्व सज्जनांनी सज्जनगडी यावे. सर्व सचेतन देहांचा संभाळ करणा-या वैश्विक शक्तीशी, रामचैतन्याशी तदाकार होण्यासाठी यावे. कोदंडधारी व्हावे,आपले परके ओळखावे, दुष्टांचा संव्हार करावा, गुण-दुर्गुण शोधावे, दुर्गुणांचा नाश करावा. निखळ सज्जनांची संख्या वाढवावी. प्रभूरामचंद्र सज्जनांचे अधिष्ठान आहेत. आराध्य आहेत. तोच एकटा समर्थ आहे. समर्थ- (सम्यक+अर्थ), सम्यक म्हणजे एकसारखा, समान,त्याच्या सारखे स्वभावता तोच एकमात्र आहे. तसेचअर्थ म्हणजे महत्व, उपयुक्ता, आवश्यकता. ज्ञान-वैराग्य-ऐश्वर्य आणिसत्ता-संपत्ती-सामर्थ्य या षडैश्वर्यामध्ये रामरायाची बरोबरी करणारा दुसरा कोणीही नाही. स्वभावता तोच एकटा आहे. **<u>दुजी तुलना तुळिता ही न साहे/</u>**महारुद्र हनुमानाच्या अनुनयातून त्याचे दास व्हा. त्याच्याशी एकरूप व्हा, सम-अर्थ व्हा. हाच संदेश पुढील कवनात देऊन अवतार संपविला.

**श्रींचे मुखावलोकन केले| परम समाधान झाले| या उपरी आपले| रहाणे न घडे ||३६||**
**अवकाश पाच दिवस| उरला आहे आम्हास| कोण पूजील हो त्यास| यश घडो||३७||**
**करणा-यांच्या करविल्यांच्या| आणिल्याच्या श्रमाचा| प्रसाद झाला सर्वांचा| मनोरथ ||३८||**
**माघ वद्य नवमी| दिवसा दोन प्रहर नेमी| शनिवारी परधामी| योग केला ||३९||**
**पलंगाखाली उतरले| पादुका पाई लेइले| उत्तरदिशेकडे केले| मुख बरवे ||४०||**
**भक्तजन विनविती| पलंगावरी बैसावे म्हणती| तेव्हा बोलिले हो प्रीती| बैसणे नाही ||४१||**
**तुम्ही बैसवाल तरी पहा| म्हणौन उचलती जण दहा| शक्तिवंत करिती अहा| नचलती आमुते।**
**करिता बहुतचि यत्न| नुचले अनुमात्र आजन| तेव्हा आज्ञापले वचन| बाहेर बसा ||४३||**
**तीन वेळा स्मरण केले| अंबर अवघे गर्जिनले| रामनामे कोंदाटिले| जिकडे तिकडे ||४७||**
**मुहूर्त एक हो गर्जना| गगनी कोंदाटिले हो आणा| विस्मय पावलो निजजना| प्रेम आले ||४८||**
**ध्वनी जाली संपूर्ण| जाह्ला अवतार होपूर्ण| देशोदेशी भक्तजन| जाते झाले ||४८||**

समर्थांनी आत्मचरित्र लिहिलेले नाही.त्यांच्या दैनंदीन कार्याची नोंद कोणी करून ठेवली नाही. देशभर मठाचे जाळे पसरविले. मठाधिपतींच्या सहाय्याने भक्तांना एकत्र करून मारुतीची उपासना सार्वजनिक केली. भारतीयांमध्ये अपेक्षित वर्तनपरिवर्तन घडवून आणले. छत्रपती शिवाजी महाराजांना राज्याभिषेक झाल्यानंतर ‘आनंदवनभूवन’ हे काव्य लिहिले. आनंदोत्सव साजरा केला. हे पृथ्वीमोलाचे अवाढव्य कार्य एका आयुष्यात ७४ वर्षात प्रत्यक्षात आले. किती संयोजन, किती परिश्रम, किती व्यवधाने संभाळली असतील. विशेष म्हणजे समर्थांचे प्रत्येक कार्य सावधान या भक्कम पायावर उभे आहे. हरिकथा सुद्धा त्याला अपवाद नाही. त्या काळात घरामधे मोठे

देवघर किंवा धुमधडाक्यात केलेले कुलधर्म-कुलाचार परकीय राजवटीला मान्य नव्हते.

**<u>माझी काया आणि वाणी| गेली म्हणाल अंतःकरणी| परी मी आहे जगज्जीवनी| निरंतर ||४५||आत्माराम दासबोध| माझे स्वरूप स्वतः सिद्ध| असता न करावा हो खेद| भक्तजनी ||४६||</u>**
**<u>नका करू खटपट| पहा माझा ग्रंथ नीट| जेणे सायोज्यतेचि वाट| गवसेल की ||४७|</u>**

आजही स्वतंत्र भारत शिव-समर्थ युतिच्या प्रतिक्षेत आहे. विश्वगुरूभारत हे ध्येय साकार करायचे आहे. समर्थांचे मार्गदर्शन हवे आहे. समर्थ म्हणतात-पहा माझा ग्रंथ नीट/ जेणे सायोज्यतेचि वाट| गवसेल की || दासबोध वाचतांनाशिवकाळात उतरा. तेथील सामाजिक राजकीय परिस्थिती लक्षात घ्या. नष्ट होत चाललेला हिंदुधर्म-संस्कृतीचा अनुभव घ्या. समर्थांच्या अगणित सेवकांचा, मरूताचा, पंचप्राणाचा, भूदेव असलेले देहधारी यांच्या कार्याचा आधार घ्या. रामचैतन्यावर विश्वास ठेवा. यश तुमचेच आहे. सर्वसमर्थ भक्त साधू, सज्जन देशभक्त असतात आणि सर्व क्रांतीकारी समर्थभक्त असतात त्यांचे अनुकरण करा. इटालियन हृदयसम्राट जूसेपी मॅझिनी यांना ‘इटलीचा रामदास’ अशी उपाधी स्वातंत्रवीर सावरकरांनी दिलेली आहे. कारण त्यांनी परकियांच्या सत्तेत असणा-या अनेक राज्यांचे विलिनीकरण करून इटलीचे स्वतंत्र प्रजासत्ताक राष्ट्र व्हावे यासाठी यशस्वी प्रयत्न केले.

समर्थांनी देहसोडला त्यावेळी दिवाकर गोसावी महाबळेश्वरला होते. छत्रपती संभाजी महाराजांना समर्थ निर्वाणाचा समाचार देणे व त्यांना घेऊन येणे यासाठी निरोप गेला. ते लगेच निघाले.रात्रीच रायगडावर पोहचले. दुस-या दिवशी सज्जनगडावर पोहचले. संभाजीराजांचनी दर्शन घेतले.

उद्धवस्वामींनी समर्थांना अग्नी दिला. तिस-या दिवशी अस्थि गोळा करण्यासाठी सर्व गेले. समर्थांची स्वयंभू समाधी आपोआप जमिनीतून वर आली.

(तंजावर येथून आलेल्या मूर्तींची स्थापना सज्जनगडावर करावी ही समर्थांची इच्छा होती. त्याप्रमाणे छत्रपती संभाजीराजे यांनी ती पूर्ण केली. तळघरात समाधीच्या वरील मजल्यावर श्रीराम-सीता-लक्षुमण आणि हनुमंता यांच्या मूर्ती असलेले दगडी मंदिर संभाजी महाराजांनी बांधलेआहे.)

समर्थनिर्वाण वार्ता सर्वदूर पसरली. देशातील सर्व हिंदूराजदरबार, सर्व समर्थ मठ, लक्षावधी समर्थशिष्य आणि भक्त तसेच अगणित क्रांतीकारक मावळे दुःखसागरात बुडाले होते. समर्थ शिष्य कल्याण स्वामी परांड्याला होते.त्यांना ही दुःखद घटना कोणी कळवली नाही. पण ती त्यांना समजली. ते सज्जनगडाच्या पायथ्याशी पोहचले. "आपले परांड्याचे कार्य अधिक महत्वाचे आहे" म्हणून सद्गुरूंनी या घटनेची कल्पना दिलेली नसावी हे त्यांना उमजले असणार.

गडावर श्रीउद्धवस्वामींच्या हस्ते अंत्यविधी आटोपले. गडावर लोकांची वर्दळ सुरूच हाती. एकाने त्यांना सांगितले की गडाच्या पायथ्याशी कल्याण स्वामी आलेले आहे. हे कळाल्या नंतर लगेच ते गड उतरले. गप्पा झाल्या. संपूर्ण गडच समाधी स्थळ झले आहे. गडाला प्रदक्षिणा घालून समाधीचे दर्शन घेतले. जवळच असलेल्या श्रीक्षेत्र माहुली येथील वाळवंटात आले. संगमाच्या तिरावर दोन समर्थ शिष्यांचा भावभावना सद्गुरू स्मरणात विसावल्या. नदीकाठावर आकाश पांघरून समर्थमय झाल्या. सकाळी समर्थशिष्य कल्याणस्वामी परांड्याला आणि श्रीउद्धवस्वामी गडावर निघाले. कल्याणस्वामींची सज्जनगडाची ही अखेरची भेट ठरली.

(संदर्भ- श्रीहंसराज स्वामींचे सन्यासनाम श्रीनारायण स्वामी यांनी लिहिलेला ग्रंथ "हंसपद्धती" श्रीसमर्थशिष्य श्रीउद्धवस्वामी परंपरेतील सातवे सत्पुरूष.)

राष्ट्रगुरू श्रीसमर्थांनी (शके १६०३) आपला अवतार संपविल्यानंतर तिन दिवसांनी समर्थभक्त श्रीभीमराज तंजावरकर सज्जनगडावर येऊन पोहचले. दर्शन झाले नाही म्हणून निग्रह करून बसले. तेंव्हा समर्थांनी समाधीतून प्रगट होऊन त्यांना दर्शन दिले. व पुढील अभंग सांगितला. हल्ली श्री संमाधीवर मधोमध जी चीर पडलेली दिसते ती याच वेळेची होय. अशी आख्यायिका प्रचलित आहे. (श्लोक १७५०)--

**माझी काया गेली खरे| मी तो आहे सर्वांतरे | ऐका स्वहित उत्तरे | सांगईन ||१||**

**राहा देहाच्या विसरे| वर्तोनका वाईट बरे | तेणो भक्तिमुक्तीची द्वारे | चोजवती||२||**

**नका करू वटवट | पहा माझा गंथपट| तेणे सायुज्जतेची वाट | ठाईपडे||३||**

**बुद्धी करावी स्वाधीन | मग हे मंजूर आहे मन| हेचि करावे साधन | दास म्हणे||४||**

**संदर्भ- श्रीसमर्थांचा गाथा संग्राहकःअनंतदास रामदासी, मोरया प्रकाशन. प्रासंगिक कविता पृष्ठ ५१३ //काव्य ११//**

**मूळपद**

**तुझा भाट मी वर्णितो रामराया।सदा सर्वदा गाय ब्रिदे सवाया ।**
**महाराज दे अंगीचे वस्त्र आता।बहुजीर्ण झाली देहे बुद्धी कंथा॥**

**सज्जनगड निवास माझे रामदास माये। माझे रामदास माये॥**
**श्रमहरिणी निवास माझे। कल्याण माये। माझे कल्याण माये॥**

सदा सर्वदा योग तुझा घडावा।तुझे कारणी देह माझा पडावा।
नुपेक्षी कदा गुणवंता आनंता। रघुनायका मागणे हेचि आता॥

ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे।त्या त्या ठिकाणी नीज रूप तुझो।
मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी। तेथे तुझे सद्‌गुरू पाय दोन्ही॥

उपासनेला दृढ चालवावे।भूदेव संतांशी सदा नमावे।
सत्कर्म योगे वय घालवावे। सर्वामुखी मंगल बोलवावे॥

रघुनाथदासा कल्याण व्हावे। अतिसौख्य व्हावे आनंदवावे।
उद्वेग नासो वर शत्रु नासो। नाना विलासे मग तो विलासो ॥१॥
कोडे नको रे कळही नको रे। कापट्य कर्मी सहसा नको रे।
निर्वाण-चिंता निरसी अनंता। शरणागता दे बहु धातमाता ॥२॥
अजयो न हो रे जयवंत हो रे। अपदा नको रे बहुभाग्य हो रे ।
श्रीमंतकारी जन हीतकारी। परऊपकारी हरिदास तारी ॥३॥

॥जय जय रघुवीर समर्थ॥
॥राष्ट्रसद्‌गुरू समर्थरामदास स्वामी महाराज की जय॥
॥महारूद्र हनुमान की जय॥
॥श्रेष्ट गंगाधर स्वामी महाराज की जय॥
॥सद्‌गुरूश्रीउद्धवस्वामी महाराज की जय॥
॥सद्‌गुरूश्रीभूषणस्वामी महाराज की जय॥
॥सद्‌गुरूश्रीकौस्तुभस्वामी महाराज की जय॥
॥सब संतनकी जय॥
आद्य सनातन वैदिक हिंदु धर्मकी जय॥

**॥जय जय रघुवीर समर्थ॥**

**॥जयहिंद॥ ॥जयमहाराष्ट्र॥**

**॥जय जय रघुवीर समर्थ॥**




**सूर्यनमस्कार प्राणायाम प्रशिक्षण वर्ग**

प्रत्येक शनिवार व रविवार

सकाळी ६.३० ते ८.३०